महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ, अधीक्षक कृषि अधिकारी संवर्गातून, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, कृषि सहसंचालक संवर्गात निव्वळ तात्पुरत्या पदोन्नतीबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
शासन आदेश क्रमांक: आकृवि-२४२५/प्र.क्र.२२८/१५-अे (ई-१४९४९०९)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २८ मार्च, २०२६.

संदर्भ:- १)सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६ब, दि.७/५/२०२१,
२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्रमाक : इएसबी-११२६/प्र.क्र.२६/आस्थामं, दिनांक २३.०३.२०२६

**शासन आदेश :-**

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये केलेल्या शिफारशीनुसार महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ अधीक्षक कृषि अधिकारी (वेतनश्रेणी एस-२३ : रु.६७७००-२०८७००) संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ कृषि सहसंचालक (वेतनश्रेणी एस-२५ : रु.७८८००-२०९२००) या संवर्गात सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टिने निव्वळ तात्पुरत्या पदोन्नतीने खालीलप्रमाणे पदस्थापना करण्यास या शासन आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | डॉ. नलिनी लक्ष्मण भोयर (रामटेके), प्रकल्प संचालक, आत्मा, वर्धा | अ.जा. | विभागीय कृषि सह संचालक, लातूर (रिक्त पदी) |
| २ | श्री. मिलिंद भदुजी शेंडे, अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, नागपूर | अ.जा. | कृषि सह संचालक (नियोजन व अंदाजपत्रक), कृषि आयुक्तालय, पुणे (रिक्त पदी) |
| ३ | श्री.संभाजी कडू ठाकूर, अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, नाशिक | अ.ज. | कृषि सह संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे (रिक्त पदी) |

२. उपरोक्त तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

**(अ)** सदर तात्पुरती पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयास अधीन राहून आणि सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात रिक्त असलेल्या पदांवर ज्येष्ठतेने देण्यात येत आहे.

**(ब)** सदर तात्पुरती पदोन्नती ही रिट पिटीशन स्टॅम्प नं. १०८७६/२०२१ व रिट पिटीशन स्टॅम्प नं. १०८७८/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २५.०५.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदर पदोन्नती नमूद रिट याचिकेत होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**(क)** सदर पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

**(ड)** सदर अधिकाऱ्यांची महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ, कृषि सहसंचालक पदावरील तात्पुरती पदोन्नती ही सदर अधिकाऱ्यांविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही, या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**(इ)** संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांचा सध्याचा पदाचा पदभार विभागातील निकटतम ज्येष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपवून तात्काळ पदोन्नतीच्या पदावर रूजू व्हावे. तसेच, पुढील बाबही निदर्शनास आणण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन अधिसूचना, दि.२१/६/२०२१ मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात पदोन्नतीच्या पदावर रूजू होणे आवश्यक आहे.

३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

४. सदर आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२८१७२३४२८७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE

Digitally signed by AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and ADF Department,
2.5.4.20=8EC4809BF7E642CE22FDACB42A63CA8410ADE167476AC90F3C879FACBF715A09, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=462D06A8B0C3DF3A0B3C93FE66F4D8A55913CE3FEBB0F6CDDF9D398D85D7377C, cn=AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
Date: 2026.03.28 17:24:36 +05'30'

**( अं.सा. चंदनशिवे )**

**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा)१/२ महाराष्ट्र मुंबई /नागपूर.
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व उपसचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सर्व कृषि संचालक, व्दारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
९. सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.सर्व कृषि सहसंचालक/सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व्दारा कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर (द्वारा-आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
१२.संबंधित अधिकारी, व्दारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.निवडनस्ती १५ अे.

******